चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४ ला मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- चंमपा-१४२३/प्र.क्र.१०६/नवि-२६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ४ जानेवारी, २०२४

**वाचा:-** १) चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा(सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण)नियम,२०१६, दि.०३.०५.२०१६.

२) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र:- चंमपा-१४२३/प्र.क्र.१०६/नवि-२६, दि.१३.०२.२०२३

३) चंद्रपूर शहर महानगरपालिका प्रशासकीय समिती सभा ठराव क्र.६८, दि.२७.०६.२०२३.

४) आयुक्त तथा प्रशासक,चंद्रपूर शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. चंशमनपा/ साप्रवि/११५२/२०२३, दिनांक १७.०७.२०२३.

**प्रस्तावना:-**

चंद्रपूर शहर महानगरपालिका ही “ड” वर्ग महानगरपालिका आहे. सदर महानगरपालिकेची स्थापना दि.२५.१०.२०११ रोजी झालेली असून चंद्रपूर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र ५४.२८ चौ.कि.मी. आहे व सद्य:स्थितीत चंद्रपूर शहराची लोकसंख्या अंदाजे ३.५० लाख इतकी आहे.

२. चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्राच्या नागरीकरणात झालेली वाढ, औद्योगिक क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाचे महत्त्वाचे उपक्रम/संस्था/प्रकल्प यामुळे पायाभुत सुविधांवर पडणारा ताण तसेच लोककल्याणकारी व गतिमान प्रशासन म्हणून नागरी स्थानिक संस्थेची भुमिका पार पाडताना चंद्रपूर शहर महानगरपालिकेला आवश्यक असलेली पदे मंजूर करण्यात आलेली असून, संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या एकूण १०१० पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे.

३. चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ ला शासनाने यापूर्वी संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. तथापि दि. १३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या एकूण १०१० पदांच्या आकृतीबंधास नव्याने मान्यता देण्यात आली असल्याने दि.०३.०५.२०१६ रोजीच्या सेवाप्रवेश नियमाचे अधिक्रमण करून सुधारीत सेवा नियम निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार चंद्रपूर शहर महानगरपालिका प्रशासक समिती सभा ठराव क्र.६८, दि.२७.०६.२०२३ अन्वये, यापूर्वीचे अमलात असलेले दि. दि.०३.०५.२०१६ चे सेवा प्रवेश नियम अधिक्रमित करून सुधारीत सेवा प्रवेश

नियमास मान्यता मिळणेकरिता आयुक्त तथा प्रशासक,चंद्रपूर शहर महानगरपालिका यांच्या संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

४. त्याअनुषंगाने चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा(सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण)नियम,२०१६, दि.०३.०५.२०१६ च्या सेवा प्रवेश नियमाचे अधिक्रमण करून नवीन सेवा प्रवेश नियमांस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**१.** चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण)नियम, २०१६, दि.०३.०५.२०१६ चे सेवा प्रवेश नियम अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**२.** चंद्रपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-४५७ (३) अनुसार शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या "चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२३" या नियमास (परिशिष्ट-१ ते ४ सह) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५४, ४५५,४५६, ४५७ (३)व ४६५ अन्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

**३.** सदर नियमांस "चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

**४.** सदर नियम शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२४०१०४१६३९५७५३२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2024.01.04 16:49:09 +05'30'

**( विद्या हम्पय्या )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह व विधी व न्याय), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
५. आयुक्त तथा प्रशासक, चंद्रपूर शहर महानगरपालिका, जि.चंद्रपूर.
६. प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. उप सचिव (नवि-२६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (नवि-२६).

# चंद्रपूर शहर महानगरपालिका

## सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४

# चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४

## अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| १. | नियम | | पृ. ३ ते ११ |
| २. | वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना. | | पृ. १२ |
| ३. | **परिशिष्ट- (१)**<br>सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती. | | पृ. १३ ते १५ |
| ४. | **परिशिष्ट- (२)**<br>संवर्गासाठी विहित केलेली अर्हता. | | पृ. १६ ते ४० |
| | **अ.क्र.** | **विभाग** | --- |
| | १. | सामान्य प्रशासन विभाग | पृ. १६ ते २१ |
| | २. | अभियांत्रिकी विभाग | पृ. २२ ते २७ |
| | ३. | नगररचना विभाग | पृ. २७ ते २८ |
| | ४. | पर्यावरण विभाग | पृ. २८ |
| | ५. | घनकचरा व्यवस्थापन विभाग | पृ. २९ ते ३० |
| | ६. | उद्यान विभाग | पृ. ३० ते ३१ |
| | ७. | लेखा/लेखा परीक्षण विभाग | पृ. ३१ ते ३३ |
| | ८. | सुरक्षा विभाग | पृ. ३३ |
| | ९. | माहिती व तंत्रज्ञान विभाग | पृ. ३४ |
| | १०. | माहिती व जनसंपर्क विभाग | पृ. ३४ |
| | ११. | ग्रंथालय/वाचनालय विभाग | पृ. ३५ |
| | १२. | विधी विभाग | पृ. ३५ |
| | १३. | सचिव विभाग | पृ. ३६ |
| | १४. | समाज विकास विभाग | पृ. ३६ |
| | १५. | शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक विभाग | पृ. ३७ |
| | १६. | आरोग्य विभाग | पृ. ३७ ते ४० |
| ५. | | **परिशिष्ट- (३)**<br>कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम-२०२३ | पृ. ४१ ते ४४ |
| ६. | | **परिशिष्ट- (३) अ**<br>विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग | पृ. ४५ |
| ७. | | **परिशिष्ट- (३) ब**<br>विभागीय परीक्षा | पृ. ४६ ते ४७ |

# चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक-चंमपा- १४२३ /प्र.क्र. १०६ /नवि-२६:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५६ (अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम, तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश तसेच चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५७ (३) अंतर्गत अनुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे:-

## <u>नियम</u>

१. **<u>संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती</u>:-**

(१) या नियमांना "चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२४" असे संबोधण्यात येईल.

(२) हे नियम अंतिमरित्या **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

(३) हे नियम चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व मंजूर पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील; मात्र, अन्यथा नमूद केले नसल्यास, अंशकालिक स्वरूपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पद्धतीने किंवा रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या तसेच मानसेवा स्वरूपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

२. **<u>व्याख्या</u>:-**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास, या नियमांसाठी-

१. "शासन" म्हणजे, महाराष्ट्र शासन.
२. "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.
३. "आयोग" म्हणजे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

४. "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "चंद्रपूर शहर महानगरपालिका."

५. "महापौर" म्हणजे, चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे महापौर.

६. "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

७. "सक्षम प्राधिकारी" म्हणजे, चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त.

८. "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५३ च्या पोटकलम-(१) ते (३) च्या तरतुदींप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

९. "निवड प्राधिकारी" म्हणजे, या नियमातील परिशिष्ट-(१) मध्ये विनिर्दिष्टीत केलेली कर्मचारी निवड समिती.

१०."अधिकारी/कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने, तसेच अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

११."संवर्ग" म्हणजे, एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या "कायम त्याचप्रमाणे हंगामी" शासनमान्य पदांचा समूह.

१२."कलम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम.

१३."परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

१४."जोडपत्र" म्हणजे, या नियमांना जोडलेले जोडपत्र.

१५."अनुसूची" म्हणजे, या नियमांना जोडण्यात आलेली अनुसूची.

१६."विभागीय परीक्षा" म्हणजे, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट-(३) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

१७."पदवी" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून प्राप्त केलेली पदवी.

१८. "पदविका" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण मंडळ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून/तंत्र निकेतनातून प्राप्त केलेली पदविका.

१९."व्यावसायिक अर्हता (Professional Qualification)" म्हणजे, अग्निशमन अभियांत्रिकी पदवी (B.E. Fire), अग्निशमन अभियांत्रिकी उच्च शिक्षा पदविका (Advanced Diploma in Fire Engineering), अग्निशमन अभियांत्रिकी पदविका (Diploma in Fire Engineering) उप अग्निशमन अधिकारी हे पाठ्यक्रम [राष्ट्रीय

अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण अकादमी, मुंबई मधून उत्तीर्ण झालेले अथवा Institute of Fire (U.K.) किंवा (India) या संस्थेमधून M.I. (Fire) किंवा Grade (I) (Fire) उत्तीर्ण झालेले.]

२०."स्वीयेतर सेवा (Foreign Service)" म्हणजे, ज्या सेवेत चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेच्या निधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही साधनाद्वारे मिळतात, अशी सेवा.

२१."मुलाखत" म्हणजे, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या पदावरील/पदांवरील नियुक्तीकरिता अर्ज केलेल्या उमेदवाराची सक्षम निवड प्राधिकाऱ्याने/निवड समितीने ज्या पदांकरिता त्याने किंवा तिने अर्ज केला आहे, त्या पदांवरील नियुक्तीकरिता निवड करण्यासाठी अशा रितीने मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांची योग्यता किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने आणि अशा मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे अनुक्रम लावण्यासाठी घेतलेली मुलाखत, असा आहे.

२२."समतुल्य/समकक्ष अर्हता" म्हणजे, संबंधित अर्हतेला समान म्हणून शासनाकडून जाहीर केलेली अर्हता, असा आहे आणि याबाबत कोणताही संदेह/वाद उद्भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम असेल.

२३. "मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था" म्हणजे, शासनाची मान्यता असलेली संस्था, असा आहे.

२४."मान्यताप्राप्त विद्यापीठ" म्हणजे, सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता असलेले विद्यापीठ, असा आहे.

२५."माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि यात शासनाने या परीक्षेशी समान म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर परीक्षेचा समावेश आहे.

२६."उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि यात शासनाने या परीक्षेशी समान म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर परीक्षेचा समावेश आहे.

२७."औद्योगिक प्रशिक्षण संस्था" म्हणजे, राज्य शासनाने विविध प्रकारच्या औद्योगिक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी तयार केलेले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र.

२८. "समय श्रेणी वेतन" म्हणजे, असे वेतन जे, या नियमात घालून देण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधीन किमान पासून कमाल पर्यंत नियतकालिक वेतनवाढीने वाढते.

२९."लेखी परीक्षा" म्हणजे चंद्रपूर शहर महानगरपालिकेकडून, योग्य रितीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाकडून, पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या योग्यतेचे किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या

प्रयोजनाकरिता घेतलेली परीक्षा आणि त्या लेखी परीक्षेतील उमेदवारांच्या कामगिरीचा संबंध असेल, तेथवर त्यांच्या गुणवत्तेचा क्रम लावण्याच्या उद्देशाने घेतलेली परीक्षा, असा आहे.

३०.“व्यावसायिक परीक्षा” म्हणजे, उमेदवारांच्या तांत्रिक कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने एखाद्या अभिकरणाकडून अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत आयोजित केलेली परीक्षा, असा आहे.

३१.“निवड समिती अध्यक्ष” म्हणजे, कर्मचारी/अधिकारी निवड समितीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निवड समिती अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले अधिकारी.

३२.“एकीकृत संवर्ग” म्हणजे, विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरुप, ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करून सेवा नियमासाठी एकीकृत केलेला संवर्ग.

३३.“अर्हताप्राप्त कर्मचारी” म्हणजे, नियमाच्या परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी.

या नियमांत वापरण्यात आलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्द किंवा शब्द समुहांचा अर्थ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात दिल्यानुसार असेल.

## ३. <u>सेवांचे वर्गीकरण (Classification of Services)</u>:-

**(३.१) <u>प्रशासकीय सेवा</u>:-** सामान्य प्रशासन, परिमंडळ कार्यालय प्रशासन, प्रभाग प्रशासन, कर व महानगरपालिका सचिवालय अंतर्गत असलेल्या विभागातील सेवा या “प्रशासकीय सेवा” संबोधण्यात येतील.

**(३.२) <u>लेखा सेवा व लेखा परीक्षण सेवा</u>:-** महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित (अर्थसंकल्प, लेखा, लेखा परीक्षण, लेखा आक्षेप निराकरण व खर्च व्यवस्थापन इत्यादी) सेवांतील पदांना “लेखा संवर्ग व लेखापरीक्षण संवर्ग” असे संबोधले जाईल व अशा पदांची सेवा “लेखा सेवा व लेखापरीक्षण सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.३) <u>तांत्रिक सेवा</u>:-** ज्या पदावरील नियुक्तीसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी/ पदविका, सांविधिक विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ/राज्य तंत्रशिक्षण मंडळ (Board of Technical Education) वा केंद्रीय तंत्र शिक्षण मंडळ (Board of Central Technical Education), तंत्र शिक्षण परिषद (Technical Council) यांचेमार्फत चालविले जाणारे विविध तांत्रिक व अभियांत्रिकी विषयक अभ्यासक्रम अशी किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल अशा पदांची सेवा “तांत्रिक सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.४) वैद्यकीय सेवा:-** ज्या पदावरील नियुक्तीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शास्त्राचा पदवीधारक, पदव्युत्तर पदवीधारक/पदविकाधारक, तसेच मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, आयुष वा तत्सम आयुर्वेदिक कौन्सिल यांच्याकडील नोंदणी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांची सेवा “वैद्यकीय सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.५) निमवैद्यकीय सेवा:-** वैद्यकीय सेवेतील पदांना सहाय्यकारी असणाऱ्या पदांच्या संवर्गाला, उदा.अधिसेविका, सहाय्यक अधिसेविका, परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, भौतिकोपचार तज्ञ, व्यवसायोपचार तज्ञ, दंत आरोग्य तज्ञ, औषध निर्माता/औषध निर्माण अधिकारी इत्यादी पदांच्या सेवेला “निमवैद्यकीय सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.६) सार्वजनिक आरोग्य सेवा:-** घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी- उदा. मुख्य स्वच्छता अधिकारी, उप मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि सफाई कामगार व तत्सम पदांच्या सेवेला “सार्वजनिक आरोग्य सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.७) अग्निशमन संवर्ग आणि सेवा:-** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम, २००७ मध्ये समाविष्ट असलेल्या सेवेला “अग्निशमन सेवा” संबोधण्यात येईल.

**४. चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवांचे गट पुढीलप्रमाणे असतील:-**

(१) अधिकारी- गट-अ व गट-ब.

(२) कर्मचारी- गट-क व गट-ड.

**५. नेमणुकीची पद्धत व अर्हता:-**

**(५.१) नियुक्तीची पद्धत:-** महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीची कार्यपद्धती परिशिष्ट-(१) मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण, अनुभव इत्यादी आवश्यक अर्हता परिशिष्ट-(२) मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पद्धत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५४ व अनुसूची-ड मधील प्रकरण-३ नुसार असेल.

**(५.२) भारतीय नागरिकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र:-** उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**(५.३) <u>संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता</u>:-** परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त गट-ड वर्ग वगळता इतर पदांवरील नेमणुकीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल, असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र इत्यादी), एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

**(५.४) <u>वयोमर्यादा</u>:-** महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी काढण्यात आलेले शासन निर्णयात नमूद केल्यानुसार असेल. चंद्रपूर शहर महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल. जेथे कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल, अशा पदांच्याबाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरिता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

(५.५) <u>पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण</u>:-

**(क)** नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण परिशिष्ट-(२) मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल.

**(ख)** पदोन्नतीच्या साखळीतील एकाकी पद सामान्यत: पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि, विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्तीने भरता येईल. तरीही उमेदवार उपलब्ध होत नसल्यास एखाद्या विशिष्ट प्रकरणी सदर पद शासन मान्यतेने नामनिर्देशन/सरळसेवेने भरता येईल.

## ६. <u>पदोन्नतीने नेमणूक करणे</u>:-

पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता-नि-पात्रता या तत्त्वावर अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-१ ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरताना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पुर्वमंजुरी घेतल्यानंतरच पदोन्नतीने भरता येतील.

## ७. प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक:-

या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार महानगरपालिकेतील ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे, अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था व स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रतिनियुक्तीने भरता येतील. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी हा शासनाच्या प्रचलित नियमापेक्षा अधिक असणार नाही. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपताच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

## ८. महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या:-

महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ तसेच या संदर्भात वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार करणे आवश्यक राहील.

## ९. एका महानगरपालिकेतून दुसऱ्या महानगरपालिकेत कायमस्वरुपी बदलीने नियुक्ती:-

या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, एका महानगरपालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने अन्य महानगरपालिकेतील सम संवर्गीय पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबींच्या अधीन राहून कायमस्वरुपी बदलीने नियुक्ती देता येईल.

**अ)** पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर कायमस्वरुपी बदलीने नियुक्ती करता येणार नाही. फक्त नामनिर्देशन/सरळसेवेने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या समसंवर्गीय व समान वेतन श्रेणीच्या रिक्त पदांवर कायमस्वरुपी बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

**ब)** अशी नियुक्ती झाल्यानंतर, त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

**क)** गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीत अन्य महानगरपालिकेतून चंद्रपूर शहर महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर शासन मान्यतेने घेतला जाईल.

**ड)** केवळ विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांचाच विचार केला जाईल.

## १०. परीविक्षाधीन कालावधी:-

गट-अ आणि गट-ब मध्ये नामनिर्देशन/सरळसेवेने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी परीविक्षाधीन कालावधी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा असेल. राज्य शासनाच्या लागू असलेल्या अटी-शर्तीनुसार परीविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच अशा उमेदवारांचे परीविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परीविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

## ११. भाषा परीक्षा, विभागीय परीक्षा व त्याबाबत प्रशिक्षण:-

महानगरपालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी:-

(१) विहित करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहित नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(२) परिशिष्ट-(३) अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(३) वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे, सेवा प्रवेशपूर्व आणि/किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुद्धा आवश्यक असेल.

## १२. महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता:-

एखाद्या व्यक्तीस:-

**(क)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल, किंवा

**(ख)** महानगरपालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

**(ग)** ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा समावेश होईल, अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

**(घ)** जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

**(च)** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार अनर्ह ठरत असेल, किंवा

**(छ)** न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती, किंवा

**(ज)** महानगरपालिकेच्या सेवेत असताना सिद्धापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या सेवेत नेमणूक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

## १३. <u>महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण</u> :-

महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष/समांतर आरक्षण, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, महिला, खेळाडू इत्यादीसाठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

## १४. <u>शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल</u> :-

महानगरपालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशन/सरळसेवेने नियुक्ती,

**(अ)** महानगरपालिकेच्या/शासकीय सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, आणि

**(ब)** उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (Verification of Antecedents) पोलीस विभागाचे/सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

## १५. <u>परिक्षेकरिता/मुलाखतीकरिता केलेल्या प्रवासाचा खर्च</u>:-

नामनिर्देशन/सरळसेवेद्वारे नियुक्ती करण्याच्या बाबतीत, परिक्षेच्या/मुलाखतीच्या प्रयोजनाकरिता उमेदवारांना करावे लागणारे सर्व प्रवास हे, याबाबतीत काही विनिर्दिष्ट प्रवर्गाच्या उमेदवारांच्या संबंधात वेळोवेळी शासन/महानगरपालिकेकडून मंजूर करण्यात आलेल्या कोणत्याही सवलतीच्या अधीन राहून, स्वत:च्या खर्चाने असतील. याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना असेल.

## १६. <u>नियुक्तीकरिता निवड झाल्यावर पदस्थापना</u>:-

नियुक्तीकरिता निवड झालेले उमेदवार हे चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत कोठेही किंवा चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर महानगरपालिकेचे कार्यालय जेथे असेल तेथे किंवा महानगरपालिका भविष्यकाळात कार्यालय सुरू करू शकेल, तेथे पदस्थापना केले जाण्यास पात्र ठरतील.

## १७. <u>प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर</u>:-

कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्तीसंदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

१८. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळी लेखी कारणे नमूद करून निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

१९. वेळोवेळी सरळसेवा/पदोन्नती/प्रतिनियुक्ती प्रमाण व पद्धती सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा/ परीविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इत्यादींबाबत निर्देश देणारे राज्य शासनाने नियम, अधिनियम, निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (Amendment) करण्यात येईपर्यंत या शासन निर्णय/न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०. सरळसेवा/पदोन्नतीने नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण धोरणाची अंमलबजावणी करावी.

२१. या नियमामधील कोणत्याही तरतुदीच्या अर्थविवरणाबाबत शंका उद्भवल्यास सदर बाब शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम राहील.

ooooooo

# वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

(महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम-११ पहा.)

मी याद्वारे प्रमाणित करतो/करते की, __________ चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या ( ) संवर्गातील ( ) या पदावर नेमणूक करण्यासाठी असलेल्या उमेदवारांची तपासणी केली आणि त्याला/तिला ___________ अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारीरिक दौर्बल्य किंवा शारीरिक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट ( ) कार्यालयात ( ) म्हणून नेमणुकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही.

श्री./श्रीमती ___________ यांच्या स्वत:च्या निवेदनावरून त्याचे/तिचे वय ______ वर्षे आहे आणि दिसण्यावरून तो/ती सुमारे _____ वर्षे वयाचा/वयाची आहे. त्याला/तिला लस टोचण्यात आली आहे.

**ओळख चिन्हे** ________________________

**डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा** ________________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव** ________________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी** ________________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम**
**(शिक्क्यासह)**

## परिशिष्ट-(१)

## चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२३ अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती:-

### १. अधिकारी/कर्मचारी निवड समिती:-

महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५४ मध्ये विहित केल्यानुसार -कर्मचारी निवड समिती◦ गठीत करण्यात येईल. सदर समिती गठीत करण्यात आलेल्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरिता अथवा भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता (यातील जो कालावधी कमी असेल, त्या कालावधीकरिता) वैध राहील.

याव्यतिरिक्त, नामनिर्देशन/सरळसेवेने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस विशेष निमंत्रित म्हणून बोलावले जाईल.

### २. नामनिर्देशन/सरळसेवेद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य लेखा परीक्षक | सदस्य |
| ३) | संबंधित विभाग प्रमुख | सदस्य |
| ४) | आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | सदस्य |
| ५) | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य |
| ६) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ७) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ८) | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) | सदस्य सचिव व निमंत्रक |

## ३. <u>नामनिर्देशन/सरळसेवेद्वारे नेमणुकीकरिता कार्यपद्धती</u>:-

**(३.१)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरावयाची महानगरपालिकेमधील पदे निश्चित करून सदर पदे भरण्यासंदर्भात शासनाने निर्देश दिल्यानंतर संबंधित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**(३.२)** सद्यस्थितीत महानगरपालिकेतील पदे भरण्यासंदर्भात पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात यावी:-

**(३.२.१)** एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, ऑनलाईन/वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरून किंवा महानगरपालिकेच्या सूचना फलकावरील सुचनेस अनुसरून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्य संस्था/कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करण्यात येईल.

**(३.२.२)** उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

**(३.२.३)** जाहिरातीत/सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणी पत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास, अशा उमेदवारांना लेखी चाचणी द्यावी लागेल.

**(३.२.४)** चाचणी परीक्षेत किमान ५०**%** गुण मिळविण्याच्या मर्यादेच्या अधीन राहून रिक्त पदाच्या तिप्पट एवढ्या उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येईल. वरील (३.२.३) च्या निर्णयाप्रमाणे चाचणी परीक्षा न घेतल्यास, अशा सर्व निर्देशित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल व अशा उमेदवारांची यादी निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास मुलाखतीच्या वेळी पुरविण्यात येईल. परंतु, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग/ इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५०**%** ऐवजी ४५% गुण मिळविण्याची अट राहील.

**(३.२.५)** मुलाखतीत खालील बाबींवर विशेष लक्ष दिले जाईल:-

**(अ)** सामाजिक प्रश्नाबाबतची जाणीव.

**(ब)** पुर्वानुभव:- ज्या पदावर नेमणूक द्यावयाची त्या पदासाठी आवश्यक असा अनुभव.

**(क)** सेवा भरती नियमात विशेष अर्हता वा इतर कोणत्याही बाबतीत प्राधान्य नमूद असल्यास त्यासाठी द्यावयाचे गुण.

**(३.२.६)** यानंतर निवड समिती एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्तांकडे गोपनीयरित्या बंद लिफाफ्यात सादर करील.

**(३.२.७)** भरती प्रक्रीयेसाठी सामान्य प्रशासन विभागाने वेळीवेळी दिलेले निर्देश लागू राहतील.

**४. <u>पदोन्नतीने नेमणुकीकरिता कार्यपद्धती</u>:-**

**(४.१)** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/का.१२, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ मध्ये तसेच वेळोवेळी शासनाच्या प्रचलित निर्णयान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी पदोन्नतीची प्रक्रिया विहित कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

**(४.२)** प्रत्येक वर्षी १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत, याचा आढावा सामान्य प्रशासन विभागातर्फे जून महिन्यात आयुक्तांना सादर केला जाईल.

**(४.३)** उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करताना, पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट (१:३) कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात (Zone of Consideration) समावेश करण्यात येईल.

**(४.४)** विभागीय चौकशी सुरू असलेल्या तसेच निलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची नावे ज्येष्ठतानुक्रमाने यादीत येत असल्यास, त्यांची नावे यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात येईल.

**(४.५)** पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांचा निवडसूचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल.

**(४.६)** निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली इतर कागदपत्रे यांचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही, तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

**(४.७)** कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास अशी माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

**५.** वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५३ (१), ५३ (२) वा ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करण्यात आलेली निवडसूची त्या-त्या निवडसूचीच्या वर्षासाठी वैध असेल.

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. गट-क आणि गट-ड मध्ये सेवा भरती करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३(भाग-२)/१६अ, दिनांक २५ ऑक्टोबर, २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वांचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

९. गट-क व गट-ड मधील अनुकंपाच्या भरावयाच्या पदांसाठी आयुक्तांच्या शिफारशीने व शासन मान्यतेने अधिसंख्य पदे निर्माण करता येतील.

**१०. पदोन्नतीसाठी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :-**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य लेखापरीक्षक | सदस्य |
| ३ | संबंधित विभाग प्रमुख | सदस्य |
| ४ | आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | सदस्य |
| ५ | उपायुक्त (सामान्य प्रशासन) | सदस्य सचिव व निमंत्रक |

०००००००

## परिशिष्ट-(२)

# महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-३६, कलम-३९ (अ), कलम-४५ व कलम- ५३ (१) मधील तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठीची कलम-४५ (३) व कलम-४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता

(पहा नियम-३)

| अ.क्र. (१) | पदनाम व श्रेणी (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (नामनिर्देशन/ पदोन्नती/प्रतिनियुक्ती) (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| | | **१. सामान्य प्रशासन विभाग** | |
| १ | आयुक्त (गट-अ, प्रशासकीय सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल, असा अधिकारी.<br>(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-३६ नुसार.) |
| २ | अतिरिक्त आयुक्त (गट-अ, प्रशासकीय सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दिनांक ०६ जानेवारी, २०१५ व शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०२१/प्र.क्र.१९१/नवि-१४, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ नुसार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा/ मुख्याधिकारी सेवेतील समकक्ष पदावरील अधिकाऱ्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३९ अ नुसार शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल. |
| ३ | उप आयुक्त | **पदोन्नती-५०%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त या पदावर किमान ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | (गट-अ, प्रशासकीय सेवा) | | वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ (२) नुसार महानगरपालिका व शासन मान्यता आवश्यक.) |
| | | **प्रतिनियुक्ती-५०%** | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१८२/नवि-१४, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९१/नवि-१४, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ नुसार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा/मुख्याधिकारी सेवेतील श्रेणी अ मधील अधिकाऱ्याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ४ | सहायक आयुक्त (गट-ब, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-५०%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधीक्षक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ (२) नुसार महानगरपालिका व शासन मान्यता आवश्यक.) |
| | | **प्रतिनियुक्ती-५०%** | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१८२/नवि-१४, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९१/नवि-१४, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ नुसार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा/मुख्याधिकारी सेवेतील श्रेणी ब मधील अधिकाऱ्याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | अधीक्षक (गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती- १००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ब)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक/स्वीय सहायक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) संवर्गातील पदावरील किमान ०३ वर्षाची नियमित सेवा.<br>**क)** वरिष्ठ लिपीक/स्वीय सहायक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) यांची आकृतीबंधात स्वतंत्र पदे मंजूर असल्याने यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी.<br>**ड)** विभागीय परीक्षा अथवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L.G.S. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ६ | वरिष्ठ लिपीक (गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर/ स्वीय सहायक (कनिष्ठ लिपीक संवर्ग)/लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर संवर्गातील पदावरील किमान ०३ वर्षाची नियमित सेवा.<br>**ब)** कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर/ स्वीय सहायक (कनिष्ठ लिपीक संवर्ग)/लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची स्वतंत्र पदे मंजूर असल्याने यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी.<br>**क)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ड)** राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**इ)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ७ | कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर | **नामनिर्देशन/ सरळसेवा-७५%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ब)** शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची |

| | | | |
|---|---|---|---|
| | (गट-क, प्रशासकीय सेवा) | | परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-२५%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-ड च्या पदावर किमान ०३ वर्ष नियमित सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>**ब)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>( हे सेवा प्रवेश नियम निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी गट-ड कर्मचारी म्हणून चंद्रपूर<br>शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सदरची अट लागू राहणार नाही. मात्र त्यांना उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.)<br>**क)** शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | शिपाई<br>(गट-ड, प्रशासकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण.<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | स्वीय सहायक<br>(वरिष्ठ लिपीक संवर्ग)<br>(गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर/ स्वीय सहायक (कनिष्ठ लिपीक संवर्ग)/लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर संवर्गातील पदावरील किमान ०३ वर्षाची नियमित सेवा.<br>**ब)** कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर/ स्वीय सहायक (कनिष्ठ लिपीक संवर्ग)/लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची स्वतंत्र पदे मंजूर असल्याने यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करावी.<br>**क)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ड)** राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**इ)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| १० | स्वीय सहायक<br>(कनिष्ठ लिपीक संवर्ग)<br>(गट-क, प्रशासकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-७५%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ब)** शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-२५%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-ड च्या पदावर किमान ०३ वर्षे नियमित सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **ब)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>( हे सेवा प्रवेश नियम निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी गट-ड कर्मचारी म्हणून चंद्रपूर<br>शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सदरची अट लागू राहणार नाही. मात्र त्यांना उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.)<br>**क)** शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ११ | वाहन चालक (प्रशासकीय सेवा)<br>(गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-७५%** | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>**क)** परवाना मिळाल्यानंतर वाहन चालविण्याचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-२५%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशन/सरळसेवेकरीता लागणारी अर्हता पूर्ण करणाऱ्या गट-ड कर्मचाऱ्यांची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **२. अभियांत्रिकी विभाग** | |
| १२ | शहर अभियंता (स्थापत्य) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>**ब)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ (४) नुसार महानगरपालिका व शासन मान्यता आवश्यक. |
| | | **प्रतिनियुक्ती** | पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास, पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य शासनाच्या समकक्ष स्थापत्य अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रचलित धोरणानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| १३ | जल अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य)/ कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा यांत्रिकी (Mechanical)/ऑटोमोबाईल (Automobile) अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **प्रतिनियुक्ती** | पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास, पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य शासनाच्या समकक्ष स्थापत्य अथवा यांत्रिकी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रचलित धोरणानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| १४ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>**ब)** शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (हे सेवा प्रवेश नियम निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना सदरची अट लागू राहणार नाही.) |
| १५ | उप अभियंता (स्थापत्य) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १६ | सहायक अभियंता (स्थापत्य) (गट-ब, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १७ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क, अभियांत्रिकी सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** ७०% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-३०%** | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणारे चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (गट-क, अभियांत्रिकी सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा- १००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २० | उप अभियंता (यांत्रिकी) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २१ | सहायक अभियंता (यांत्रिकी) (गट-ब, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २२ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) (गट-क, अभियांत्रिकी सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची यांत्रिकी (Mechanical) / ऑटोमोबाईल (Automobile) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २३ | कार्यकारी अभियंता (विद्युत) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (विद्युत) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २४ | उप अभियंता (विद्युत) (गट-अ, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक अभियंता(विद्युत) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | सहायक अभियंता (विद्युत) (गट-ब, अभियांत्रिकी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २६ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (गट-क, अभियांत्रिकी सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची विद्युत (Electrical) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २७ | गाळणी परिचर (पाणी लॅब टेक्निशियन) (गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची विज्ञान शाखेची रसायन शास्त्राची पदवी (B.Sc., Chemistry).<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २८ | मेकॅनिक (मोटर/डिझेल/ ऑटो-इलेक्ट्रीशन) (गट-क, तांत्रिक सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक मोटर मेकॅनिक/ सहायक डिझेल मेकॅनिक/सहायक मेकॅनिक (ऑटो-इलेक्ट्रीशन) या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यामधून एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | सहायक मोटर मेकॅनिक (गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे मोटर मेकॅनिक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>**क)** जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**इ)** संबंधित कामाचे अनुभव धारकास प्राधान्य.<br>**फ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३० | सहायक डिझेल मेकॅनिक (गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे डिझेल मेकॅनिक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>**क)** जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**इ)** संबंधित कामाचे अनुभव धारकास प्राधान्य.<br>**फ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३१ | सहायक मेकॅनिक (ऑटो-इलेक्ट्रीशन) (गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-** १००% | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ऑटो-इलेक्ट्रीशन मेकॅनिक अभ्यासक्रम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>**क)** जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**इ)** संबंधित कामाचे अनुभव धारकास प्राधान्य.<br>**फ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३२ | वीजतंत्री (इलेक्ट्रीशिन)<br>(गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-**<br>१००% | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे इलेक्ट्रीशिन अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** संबंधित कामाचे अनुभव धारकास प्राधान्य.<br>**इ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३३ | वॉलमन<br>(गट-ड, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-**<br>१००% | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.).<br>**ब)** शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर/प्लंबर/फिटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **३. नगर रचना विभाग** | |
| ३४ | सहायक संचालक, नगर रचना (गट-अ, शहर विकास सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील समकक्ष अधिकारी प्रतिनियुक्तीने. |
| ३५ | नगर रचनाकार (गट-ब, शहर विकास सेवा) | **पदोन्नती-५०%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक नगर रचनाकार या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **प्रतिनियुक्ती-५०%** | संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील समकक्ष अधिकारी प्रतिनियुक्तीने. |
| ३६ | सहायक नगर रचनाकार (गट-क, शहर विकास सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची आर्किटेक शाखेची (B.Arch.) किंवा स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** राज्य शासन/केंद्र शासनाकडील नगर रचना विषयाची मान्यता प्राप्त अभ्यासक्रमास प्राधान्य.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **४. पर्यावरण विभाग** | |
| ३७ | पर्यावरण संवर्धन अधिकारी (गट-अ, तांत्रिक सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रदूषण नियंत्रण अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यामधून सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **प्रतिनियुक्ती** | राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद किमान ३ वर्ष धारण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (पदोन्नतीकरीता अर्हता धारक उमेदवार उपलब्ध नसल्यास) | करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ३८ | प्रदूषण नियंत्रण अधिकारी (गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची पर्यावरण अभियांत्रिकी (Environmental Engineering) शाखेची पदवी.<br>**ब)** पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **५. घनकचरा व्यवस्थापन विभाग** | |
| ३९ | मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची M.B.B.S./B.A.M.S. परीक्षा उत्तीर्ण.<br>**ब)** मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**क)** शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मूलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींचे कार्याचा किमान ०३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ४० | उप मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | स्वच्छता अधिकारी (गट-क, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४२ | स्वच्छता निरीक्षक (गट-क, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-७५%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची पदवी.<br>**ब)** स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-२५%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुकादम या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या अथवा सफाई कामगार या पदावर किमान १० वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४३ | मुकादम (गट-ड, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सफाई कामगार या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४४ | सफाई कामगार (गट-ड, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **नामनिर्देशन/वारसा हक्क-१००%** | **अ)** इयत्ता ७ वी उत्तीर्ण.<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| ६. उद्यान विभाग | | | |
|---|---|---|---|
| ४५ | उद्यान अधिक्षक<br>(गट-क, उद्यान सेवा) | **पदोन्नती** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उद्यान निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **नामनिर्देशन/ सरळसेवा**<br>(पदोन्नतीकरीता अर्हता धारक उमेदवार उपलब्ध नसल्यास) | ७. शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/ शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील संबंधित कामकाजाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ४६ | उद्यान निरीक्षक<br>(गट-क, उद्यान सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/ शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.<br>**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ४७ | माळी<br>(गट-ड, उद्यान सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-ड च्या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण आणि कृषी विद्यापीठाने निर्धारीत केलेला माळी व्यवसायाचा ०१ वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्याची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४८ | मजदूर उद्यान (गट-ड, उद्यान सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** इयत्ता ७ वी उत्तीर्ण.<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| **७. लेखा/लेखा परीक्षण विभाग** | | | |
| ४९ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (गट-अ, लेखा सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट-अ वरिष्ठ अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीच्या धोरणानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ५० | मुख्य लेखा परीक्षक (गट-अ, लेखा परीक्षण सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट-अ वरिष्ठ अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीच्या धोरणानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ५१ | लेखा अधिकारी/लेखा परीक्षा अधिकारी (गट-ब, लेखा सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखापाल/वरिष्ठ लेखा परीक्षक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **प्रतिनियुक्ती** | पदोन्नतीने पद उपलब्ध होईपर्यंत महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील समकक्ष पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ५२ | लेखापाल/वरिष्ठ लेखा परीक्षक | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपिक (लेखा)/कनिष्ठ लेखा परीक्षक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा |

| | | | |
|---|---|---|---|
| | (गट-क, लेखा सेवा) | | उत्तीर्ण अथवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L.G.S. किंवा G.D.C.&A. परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | | पदोन्नतीकरिता वरिष्ठ लिपिक (लेखा)/कनिष्ठ लेखा परीक्षक उपलब्ध होईपर्यंत, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी (B.Com) ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या तसेच विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L.G.S. किंवा G.D.C.&A. परीक्षा उत्तीर्ण असलेल्या पात्र कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे विकल्प/बंधपत्र घेऊन पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५३ | वरिष्ठ लिपीक (लेखा)/ कनिष्ठ लेखा परीक्षक (गट-क, लेखा सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखा लिपीक किंवा अकॉउंटन्ट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | | पदोन्नतीकरिता लेखा लिपीक उपलब्ध होईपर्यंत, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी (B.Com) ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे विकल्प/बंधपत्र घेऊन पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५४ | लेखा लिपीक (गट-क, लेखा सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा**-१००% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी (B.Com).<br>**ब)** शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br><br>नामनिर्देशन/सरळसेवेने कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत, चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक कम कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावरील कार्यरत असलेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी (B.Com) ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे विकल्प/बंधपत्र घेऊन नियुक्ती करता येईल. |
| **८. सुरक्षा विभाग** | | | |
| ५५ | सुरक्षा अधिकारी<br>(गट-ब, सुरक्षा सेवा) | **नामनिर्देशन/<br>सरळसेवा**-१००% | **अ)** शासनमान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर.<br>**ब)** लष्कर, निमलष्करी दलातील ज्युनियर कमिशंड ऑफिसर अथवा पोलीस दलातील सहा.पोलीस निरीक्षक या पदावरील अनुभव धारकास प्राधान्य<br>**क)** किमान शारीरिक पात्रता,<br>१) **उंची**-१६५ सें.मी. (महिला उमेदवाराकरिता १५७ से.मी.)<br>२) **छाती**- सर्वसाधारण ८१ सें.मी. फुगवून ०५ सें.मी. जास्त (महिला उमेदवाराकरिता लागू नाही)<br>३) **वजन**- किमान ५० कि.ग्रॅ. (महिला उमेदवाराकरिता ४६ कि.ग्रॅ.)<br>४) **दृष्टी** -चांगली (विना चष्म्याने दृष्टी ६/६ तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली)<br>**ड)** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **९. माहिती व तंत्रज्ञान विभाग** | |
| ५६ | सिस्टीम मॅनेजर<br>(गट-ब, तांत्रिक सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सिस्टीम ॲनालिस्ट या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५७ | सिस्टीम ॲनालिस्ट<br>(गट-क, तांत्रिक सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रोग्रामर या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५८ | प्रोग्रामर<br>(गट-क, तांत्रिक सेवा) | **नामनिर्देशन/<br>सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (B.E./B.Tech. in Computer Science/Information Technology/MCA) उत्तीर्ण.<br>**ब)** प्रोग्रामिंग/सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील किमान ०३ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **१०. माहिती व जनसंपर्क विभाग** | |
| ५९ | माहिती व जनसंपर्क अधिकारी<br>(गट-क, जनसंपर्क सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक माहिती व जनसंपर्क अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६० | सहायक माहिती व जनसंपर्क अधिकारी (गट-क, जनसंपर्क सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>**ब)** शासनमान्य पत्रकारिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका.<br>**क)** शासनमान्य संस्थेमधील संबंधित कामकाजाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**इ)** मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे ज्ञान आवश्यक. |
| | | **११. ग्रंथालय/वाचनालय विभाग** | |
| ६१ | ग्रंथपाल (गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक ग्रंथपाल या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ६२ | सहायक ग्रंथपाल (गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क च्या पदावर किमान ०३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व शासनमान्य विद्यापीठाची ग्रंथालय शाखेची पदवी (B.Lib) अर्हताधारक कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | **नामनिर्देशन/ सरळसेवा** (पदोन्नतीकरीता अर्हता धारक उमेदवार उपलब्ध नसल्यास) | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची पदवी (B.Lib).<br>**ब)** शासनमान्य विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची पदव्युत्तर पदवी (M.Lib) असल्यास प्राधान्य.<br>**क)** शासकीय/निमशासकीय शैक्षणिक संस्थामधील अनुभवधारकास प्राधान्य. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**इ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| **१२. विधि विभाग** | | | |
| ६३ | विधि अधिकारी (गट-ब, विधी सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक विधि अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ६४ | सहायक विधि अधिकारी (गट-क, विधी सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची विधि शाखेची पदवी (L.L.B.).<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधित कामकाजाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| **१३. सचिव विभाग** | | | |
| ६५ | महापालिका सचिव (गट-ब, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक. विधि शाखेची पदवी असल्यास प्राधान्य.<br>**ब)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील महापालिका उप सचिव/अधीक्षक/सहायक अधीक्षक संवर्गातील पदावरील किमान ०३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **क)** नियुक्तीस चंद्रपूर शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक. |
| ६६ | महापालिका उप सचिव (गट-क, प्रशासकीय सेवा) | **पदोन्नती-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक. विधि शाखेची पदवी असल्यास प्राधान्य.<br>**ब)** चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक/स्वीय सहायक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) संवर्गातील पदावरील किमान ०३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| **१४. समाज विकास विभाग** | | | |
| ६७ | समाज विकास अधिकारी (गट-ब, समाज सेवा) | **पदोन्नती-१००%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक समाज विकास अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ६८ | सहायक समाज विकास अधिकारी (गट-क, समाज सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची समाजशास्त्र शाखेची पदवी किंवा कोणत्याही शाखेची पदवी आणि MSW पदव्युत्तर पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील प्रकल्प अधिकारी या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य.<br>**क)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| **१५. शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक विभाग** | | | |
| ६९ | प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग (गट-अ, शिक्षण सेवा) | **प्रतिनियुक्ती-१००%** | शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील प्रचलित सेवा प्रवेश नियम व धोरणानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ७० | क्रीडा अधिकारी (गट-क, क्रीडा सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य बीपीएड पदवी.<br>**ब)** स्पोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांचेकडील पदविका धारकास प्राधान्य.<br>**क)** क्रीडा क्षेत्रातील संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभव.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>**इ)** राष्ट्रीय/राज्यस्तरीय खेळाडूस प्राधान्य. |
| **१६. आरोग्य विभाग** | | | |
| ७१ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी (MOH) (गट-अ, वैद्यकीय सेवा) | **पदोन्नती** किंवा **प्रतिनियुक्ती** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची जन औषध वैद्यक शास्त्रातील पदवी {M.D. (P.S.M.)} परीक्षा उत्तीर्ण /डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ परीक्षा उत्तीर्ण.<br>**ब)** मेडीकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**क)** शासन/केंद्र शासन/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहायक आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ०७ वर्षाचा पर्यवेक्षक व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>**ड)** रूग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत: स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मुलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींचा कार्याचा किमान ०७ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>**इ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>**फ)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ४५ (४) नुसार महानगरपालिका व शासन मान्यता आवश्यक.<br>**ग)** उपरोक्त अर्हता धारण करणारे चं.श.म.न.पा.आस्थापनेवर कार्यरत वैद्यकीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी/ मुख्य स्वच्छता अधिकारी पदोन्नती करिता पात्र राहील.<br>**ह)** पदोन्नतीने योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास, शासनाकडील वैद्यकीय सेवेतील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ७२ | वैद्यकीय अधिकारी,<br>राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम<br>(गट-ब, वैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. (आयुर्वेद) पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभव.<br>**क)** मेडीकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७३ | वैद्यकीय अधिकारी,<br>राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त<br>(जन्म-मृत्यु व विवाह नोंदणी सह)<br>(गट-ब, वैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. (आयुर्वेद) पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभव.<br>**क)** मेडीकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७४ | वैद्यकीय अधिकारी<br>(महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम इत्यादी कायदे अंमलबजावणी)<br>(गट-ब, वैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. (आयुर्वेद) पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभव.<br>**क)** मेडीकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७५ | वैद्यकीय अधिकारी<br>(पी.सी.पी. एन.डी.टी. | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. (आयुर्वेद) पदवी.<br>**ब)** शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एम.टी.पी. इत्यादी कायदे अंमलबजावणी) (गट-ब, वैद्यकीय सेवा) | | वर्षाचा अनुभव.<br>**क)** मेडीकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>**ड)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७६ | सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पी.एच.एन./एन.एम.) (गट-क, निमवैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-५०%** | **अ)** शासनमान्य विद्यापीठाची बी.एस्सी. (नर्सिंग) या विषयाची पदवी.<br>किंवा<br>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>**ब)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>**क)** अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रुग्णालयातील प्रत्यक्ष परिचारिका म्हणून कामकाजाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**ड)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**इ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | **पदोन्नती-५०%** | चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक परिचारीका प्रसाविका (ए.एन.एम.)/ ए.एन.एम. पदावर किमान ०३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ७७ | सहायक परिचारीका प्रसाविका (ए.एन.एम.) (गट-क, निमवैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** शासनमान्य संस्थेचा ए.एन.एम. (A.N.M.) अभ्यासक्रम पूर्ण. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **क)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>**ड)** अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रुग्णालयातील प्रत्यक्ष परिचारिका म्हणून कामकाजाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**इ)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**फ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७८ | औषध निर्माता (फार्मासिस्ट) (गट-क, निमवैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/ सरळसेवा-१००%** | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>**ब)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.फार्म पदविका उत्तीर्ण, बी.फार्म. पदवी असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>**क)** महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र महाराष्ट्र फार्मसी ॲक्ट, १९४८ (Maharashtra Pharmacy Act of १९४८ ) नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.<br>**ड)** संबंधित विषयातील कामाचा ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**इ)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा अथवा समकक्ष असलेली शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>**फ)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

**टिप :- अग्निशमन विभागातील पदाचे सेवा प्रवेश नियम शासन निर्णय क्र. चंमपा-२०१७/प्र.क्र. ७१/नवि-२६, दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये मंजूर करण्यात आलेले आहे.**

ooooooo

परिशिष्ट-(३)

# <u>चंद्रपूर शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम, २०२३</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) च्या कलम-४६५, पोटकलम-(१) खंड (ल) च्या तरतुदींनुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेसाठी केलेले नियम:-

## <u>नियम</u>

१. **<u>संक्षिप्त शीर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक</u>**:-

**(अ)** या नियमास "चंद्रपूर शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम, २०२३" असे संबोधण्यात येईल.

**(ब)** **शासन राजपत्रात** प्रसिद्ध होतील, त्या तारखेपासून हे नियम अंमलात येतील.

२. **<u>व्याख्या</u>:-** विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार,

**(२.१)** "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.

**(२.२)** "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "चंद्रपूर शहर महानगरपालिका."

**(२.३)** "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

**(२.४)** "कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारी, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने तसेच, अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

**(२.५)** "परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

**(२.६)** "विभागीय परीक्षा" म्हणजे, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट- (३) (अ) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

ज्या शब्दांची वा शब्दसमुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल, त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

## ३. <u>विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य</u>:-

**(३.१)** हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस चंद्रपूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी/अस्थायी स्वरुपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना परिशिष्ट-(३) च्या (ब) व (क) मध्ये विहित केलेली आवश्यक ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

**(३.२)** उपरोक्त परिशिष्ट-(३) (अ) मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल, त्या संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची लेखी व तोंडी परीक्षा आयुक्तांच्या मान्यतेने घेतली जाईल. याकरिता किमान तीस दिवसांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीची पुर्वसूचना संबंधितांस देण्यात येईल.

## ४. <u>कालावधी आणि संधीची संख्या</u>:-

**(४.१) शासन राजपत्राच्या** दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तींकरिता कालावधी व संधीची संख्या या नियमांच्या अधीन राहून, **शासन राजपत्राच्या** दिनांकापूर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणून नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-१० अन्वये सूट दिलेली नसेल, तर **शासन राजपत्राच्या** दिनांकापासून ३ वर्षांच्या आत व २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**(४.२)** चंद्रपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२३ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक:-**

(**५.१**) चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक असेल.

(**५.२**) प्रत्येक संवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या सर्व विषयांत वरील तरतुदीच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

६. **परीक्षेचे वेळापत्रक:-**

विभागीय परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या सक्षम प्राधिकारी यांनी विहित केलेल्या अभिकरणाकडून सर्वसाधारणपणे दरवर्षी प्रशासनाच्या/अभिकरणाच्या सोयीनुसार अशा परीक्षा मे ते जून महिन्यात घेतल्या जातील.

७. **परीक्षेचा अभ्यासक्रम:-**

विभागीय परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम परिशिष्ट- (३) (ब) मध्ये विहित केल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

परंतु, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था, नाशिक यांच्याकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेल्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

८. **प्रशिक्षण:-**

विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परीक्षेपूर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम चंद्रपूर शहर महानगरपालिकेकडून आयोजित करण्यात येईल.

९. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम:-**

एखादा कर्मचारी नियम-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील:-

(९.१) तो परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम-१० अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत, त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशा रितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ ही, तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-१० अन्वये सूट

देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकी अनुज्ञेय नसेल.

(९.२) त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच, अशा ज्या कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल, त्या कर्मचाऱ्यास ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्यानंतर, परंतु नियम-४ मध्ये विर्निदिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या देखील नंतरचा ज्येष्ठता क्रम त्याला देण्यात येईल.

१०. <u>परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट</u>:-

(१०.१) **शासन राजपत्राच्या** दिनांकापूर्वी नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील बाबतीत सूट देण्यात येईल:-

**(अ)** त्यास यापूर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी किंवा

**(ब)** तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशा प्रकरणी किंवा,

**(१०.२)** कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

११. परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही, तर कालावधी व संधीची गणना करताना कालावधी वगळण्यात येईल.

१२. <u>विशेष योग्यता</u>:-

एखादा कर्मचारी पहिल्याच प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि त्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेत ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविले असतील तर त्या प्रश्नपत्रिकेतील त्याच्या विशेष योग्यतेबद्दलची नोंद गोपनीय अहवालात घेण्यात येईल.

१३. <u>विषयांमध्ये सूट</u>:-

जो उमेदवार परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेला आहे परंतु ज्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ५५ टक्के किंवा अधिक गुण मिळविलेले आहे त्याला त्याच्या नंतरच्या

प्रयत्नांमध्ये त्या विषयासाठी परीक्षेला बसण्यातून व उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येईल.

१४. <u>**निर्वचनाच्या शक्ती**</u>:- नियमातील तरतुदींनुसार अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे, यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

**दिनांक :- ४ जानेवारी, २०२४**

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2024.01.04 16:50:02 +05'30'

**(विद्या हम्पय्या)**
**शासनाचे उप सचिव**

००००००००

## परिशिष्ट-(३) (अ)

(नियम-३)

# विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

| अ.क्र. | विभाग/सेवा | संवर्ग |
|---|---|---|
| १. | प्रशासकीय सेवा | अधीक्षक |
| २. | लेखा सेवा | लेखापाल |
| ३. | लेखा परीक्षण सेवा | वरिष्ठ लेखा परीक्षक |

ooooooo

## परिशिष्ट-(३) (ब)

# विभागीय परीक्षा

**प्रश्नपत्रिका-१** **(गुण- १००, वेळ-३ तास)**

१. सारांश लेखन.
२. टिप्पणी लेखन.
३. पत्र लेखन.
४. भाषांतर (इंग्रजीतून मराठीत).

**प्रश्नपत्रिका-२** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम
२. किमान वेतन अधिनियम
३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
५. वस्तु व सेवा कर.

**<u>प्रश्नपत्रिका-३</u>** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१) सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियम:-
सेवेच्या सर्व साधारण शर्ती
रजा
वेतन
वर्तणूक, शिस्त व अपील
निवृत्तीवेतन
२) विभागीय चौकशी नियम पुस्तिका.
३) रचना व कार्यपद्धती- सहा गठ्ठे पद्धती.
४) कार्यालयीन नियमपुस्तिका, जमाखर्च लेखा परीक्षा.
५) प्राथमिक हिशोब तपासणी.

**टीप:** या प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेत द्यावी लागतील.

००००००००

**<u>लेखा विभाग/लेखा परीक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक (लेखा)/कनिष्ठ लेखा परीक्षक यांना प्रश्नपत्रिका-१, २, ३ व्यतिरिक्त पुढे विहित करण्यात आलेल्या विषयांच्या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल</u>**

**<u>प्रश्नपत्रिका-४</u>** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१. मुंबई वित्तीय नियम, १९५९.
२. महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तिका प्रकरण क्र. ४,५,७,९ व १७ तसेच परिशिष्टे २, ४, ८, ९, ११ वगळून.
३. महाराष्ट्र सार्वजनिक खर्च नियमावली, १९६५ तसेच नियमावली, १९९२.
४. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील २,३,६,७,८,९,१०,११,१२-१ ते १२-५ प्रकरणे.
५. महानगरपालिकेच्या निविदेसाठीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती.

**<u>प्रश्नपत्रिका-५</u>** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१. Book Keeping & Accountancy.
२. Accrual Based Double Entry Accounting

३. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७

४. मुंबई प्राथमिक शिक्षण नियम, १९४९

**गट - क च्या कर्मचाऱ्यांना गट- ब च्या पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी या परिशिष्टातील प्रश्नपत्रिका– १, २ व ३ व्यतिरिक्त खालील प्रश्नपत्रिकेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल**

**प्रश्नपत्रिका–६** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.
२. महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन) उपविधी, २००२.
३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षांचे जतन अधिनियम, १९७५.
४. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान.
५. झोपडपट्टी सुधार समिती.
६. दिव्यांगांसाठीच्या शासनाच्या सवलती व योजना.
७. समाज विकास व बाल कल्याण संबंधीच्या शासनाच्या व महानगरपालिकेच्या योजना.
८. केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना.

ooooooo

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिनांक :- ४ जानेवारी, २०२४**

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2024.01.04 16:49:40 +05'30'

**(विद्या हम्पय्या)**
**शासनाचे उप सचिव**